जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे बांधकाम व दुरुस्ती संदर्भात मार्गदर्शक सूचना..........

# महाराष्ट्र शासन

## मृद व जलसंधारण विभाग

**शासन निर्णय क्रमांक : कोपबं-२०१८/प्र.क्र.१८३/जल-१**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक : २० जुलै, २०१८.**

**प्रस्तावना :**

राज्यात जलसंधारण विभागामार्फत कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व गेटेड बंधारे इत्यादी कामे जिल्हा वार्षिक योजनेमधून घेण्यात येतात. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून जिल्हा वार्षिक योजनाअंतर्गत ० ते २५० हे. क्षमतेपर्यंतच्या कोल्हापुरी पध्दतीचे बंधा-याच्या बांधकामासोबतच दुरुस्तीच्या कामाचाही समावेश करण्यात आलेला आहे. शासन निर्णय क्रमांक जिवायो-२०१६/प्र.क्र.२९३/जल-१ दिनांक ५.०८.२०१७ नुसार ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघुसिंचन (जलसंधारण) योजनांच्या बांधकामाबाबत सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

० ते २५० हे. क्षमतेच्या कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे बांधकाम व दुरुस्ती या जिल्हास्तरीय योजना बाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

**भाग A) नविन बांधकामा संदर्भात मार्गदर्शक सुचना :**

i) ० ते २५० हे.सिंचन क्षमतेच्या मर्यादेत कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे/गेटेड बंधाऱ्याचे नवीन बांधकामे घेता येतील.

ii) नविन बांधकाम संदर्भात कामनिहाय प्रचलित व शासन वेळोवेळी निश्चित करेल असे तांत्रिक व आर्थिक मापदंड लागु राहतील. नविन बांधकामे ही उपलब्ध निधीच्या तरतुदीनुसार व विहीत कार्यपध्दती अवलंबून सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकिय मान्यता घेवुन हाती घेण्यात यावीत.

iii) बांधकामासंदर्भात शासन निर्णय क्रमांक जिवायो-२०१६/प्र.क्र.२९३/जल-१ दिनांक ०५.०८.२०१७ नुसार मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन कार्यवाही करण्यात यावी.

**भाग B) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची/गेटेड बंधाऱ्यांची दुरुस्ती :-**

कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरूस्ती संदर्भात सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे आहेत.

i) पायातून गळती होत असल्यास कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या वरील बाजुस (Up Stream) पायापासून (Foundation) ते Sill level पर्यंत ३० सें.मी. * ३० सें.मी. संधानकामध्ये Beam घेऊन ती मधून आवश्यक जाडीची काँक्रिट पडदी टाकण्यात यावी.

ii) पिअर वॉलची तुटफूट होवुन ५० टक्केपेक्षा कमी क्षतीग्रस्त असल्यास, त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या साहित्याचा वापर करुन त्याची पुर्नबांधणी करण्यात यावी व ५०% पेक्षा अधिक तूटफूट असल्यास नविन पिअर घेण्यात यावा.

iii) चॅनल नादुरुस्त असल्यास किंवा जागेवर उपलब्ध नसल्यास चॅनलची पुर्नबांधणी करण्यात यावी. काही ठिकाणी कोल्हापूरी बंधाऱ्याचे गेट हे जागेवर उपलब्ध नसतात (चोरी किंवा अन्य कारणाने) किंवा क्षतीग्रस्त झालेले असतात, अशा ठिकाणी दुरुस्त करण्यासारख्या गेटची प्राधान्याने स्थानिक रित्या दुरुस्ती करण्यात यावी. किरकोळ दोष असलेले गेट Scrap न करता त्याची वरील प्रमाणे स्थानिकरित्या दुरुस्ती करण्यात यावी. रबर सील खराब असल्यास चांगल्या दर्जाचे ISI मार्क असलेले रबरी सील उपलब्ध करुन घेण्यात यावेत.

iv) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची Out Flanking दुरुस्तीकरिता आवश्यक असलेला मातीचा भराव त्या ठिकाणी टाकण्यात यावा व त्याची दबाई करण्यात यावी. भरावाकरीता लागणारी आवश्यक माती को.प.बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रातून उपलब्ध करण्यात यावी. भराव आवश्यकतेनुसार दुरुस्त करण्यात यावा. को.प.बंधारे गेट काढणे/ टाकण्याचे काम पाणी वापर संस्थेच्या/ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्यात यावे. गेट काढणे व घालणे यासाठी आवश्यक यांत्रिकी उपकरणाचे (Mechanical Lifting Devices) सहाय्य घेण्यात यावे.

v) वरील (i) ते (iv) व्यतिरीक्त स्थापत्य दुरुस्ती आवश्यक असल्यास स्थानिक परिस्थीतीनुसार घेण्यात यावी.

vi) ज्या को.प. बंधाऱ्यांना १० वर्षे किंवा अधिक कालावधी झालेला आहे असे को.प बंधारे दुरूस्तीसाठी पात्र राहतील. तथापि नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या क्षती करीता १० वर्षाचा कालावधी जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने कमी करता येईल. एकदा दुरुस्त केलेला को.प बंधारा पुढील ५ वर्षे पुनश्च दुरुस्तीकरीता अनुज्ञेय असणार नाही.

vii) एका को.प बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या सर्व कामाचे (घटकांचे) एकच अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. कामाचे तुकडे (भाग) करण्यात येवू नयेत.

viii) दुरुस्ती करावयाच्या को.प.बंधाऱ्याच्या दुरुस्तीची किंमत प्रचलित आर्थिक मापदंडाच्या २० टक्के मर्यादेत असावी.

ix) दुरुस्ती करावयाच्या को.प बंधाऱ्याच्या दुरुस्तीची किंमत प्रचलित आर्थिक मापदंडाच्या २० टक्के पेक्षा अधिक असल्यास अशा कामाचे अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देण्यापुर्वी जिल्हा जलसंधारण अधिकारी (जलसंधारण विभाग) व जिल्हा जलसंधारण अधिकारी (जि.प) यांनी संयुक्त स्थळ पाहणी करुन निरिक्षण टिप्पणी काढून कामाच्या बाबी निश्चित करणे आवश्यक राहील. अनावश्यक कामे घेण्यात येऊ नयेत. अशी अनावश्यक कामे घेतल्याचे निदर्शनास आल्यास यांची जबाबदारी संयुक्तपणे स्थळ पाहणी करणा-या अधिका-यावर निश्चीत करण्यात येईल. या स्थळ निरिक्षण टिप्पणी मध्ये प्रचलित आर्थीक मापदंडाच्या २० टक्के पेक्षा कमी रक्कमेमध्ये को.प.बंधाऱ्याची दुरुस्ती करणे शक्य नसल्याबाबतची कारण मिमांसा आवश्यक राहील. अशा प्रकरणामध्ये प्रशासकीय मान्यता देताना सक्षम प्राधिकाऱ्यांने निरिक्षण टिप्पणी विचारात घेऊनच प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

x) दुरुस्तीची कामे ही उपलब्ध निधीच्या तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेवून हाती घेण्यात यावीत.

xi) दुरुस्तीचे काम सुरु करण्यापुर्वी, काम सुरु असताना व काम पुर्ण झाल्यानंतर छायाचित्रे (फोटो) घेण्यात यावीत व त्याचे Geotaging करण्यात यावे.

**भाग C ) पाणी वापर संस्था स्थापन करणे व नियमित देखभाल करणे**

i). पाणीवापर संस्था स्थापन करणे व नियमित देखभाल करणे या संदर्भात कोल्हापूर पध्दतीच्या /गेटेड बंधाऱ्याच्या ठिकाणी पाणी वापर संस्थेमार्फत व्यवस्थापन करण्याबाबत सुचना ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक ३१ जुलै, २००० नुसार सविस्तर सुचना दिलेल्या आहेत त्यानुसार कार्यवाही करावी.

ii) ५० हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमता असलेल्या प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन करण्याकरीता प्रति पाणी वापर संस्था कमाल रु.२५,०००/- व ५० हेक्टर पेक्षा जास्त सिंचन क्षमता असलेल्या प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन करण्याकरीता प्रति पाणी वापर संस्था कमाल रु. ५०,०००/- इतका खर्च अनुज्ञेय राहील.हा निधी ग्रामसभा घेणे, बैठका आयोजित करणे, प्रस्ताव तयार

करुन नोंदणी प्रक्रीया पुर्ण करुन नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे, प्रशिक्षण आयोजित करणे, पाणी वापर संस्थेची क्षमता बांधणी करणे, पाणी वापर संस्थेच्या सदस्यानां यशस्वी पाणी वापर संस्थाना भेटी देणे, संस्था हस्तांतरित करणे व संस्था किमान ३ वर्षे कार्यन्वयन करणे इत्यादी बाबी करीता अनुज्ञेय राहील.पाणी वापर संस्था स्थापन करण्याबाबत आयुक्त, जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद यांनी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

iii) कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे/ गेटेड बंधारे यांच्या देखभालीकरीता पाणी वापर संस्था हस्तांतर केल्यानंतर पुढील तीन वर्षापर्यंत ९०% निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. उर्वरित १०% रक्कम संस्थेने / ग्रामपंचायतीने पाणीपट्टी वसूली व लोकसहभागातून उभारण्यात यावी. तदनंतरची दोन वर्ष ६०% निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. उर्वरीत ४०% निधी संस्थेने पाणीपट्टी व्दारे वसुल रकमेतुन/ लोकसहभागातून करावा. ग्रामपंचायतीला सुध्दा या प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. उपरोक्त कालावधीनंतर पाणी वापर संस्था/ग्रामपंचायत यांनी स्वनिधीतून देखभालीकरीता खर्च करावा.

iv) नियमीत देखभालीचे काम अर्धकुशल स्वरुपाचे असल्यामुळे ही कामे पाणी वापर संस्था/ ग्रामपंचायत मार्फत करण्यात यावीत. याकरीता प्रचलीत दरसुची नुसार संबंधीत कनिष्ठ अभियंता / उपअभियंता यांनी अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम अधिकाऱ्याची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी व त्यानुसार कार्यारंभ आदेश पाणीवापर संस्था/ ग्रामपंचायतीस देण्यात यावा. काम पुर्ण झाल्यानंतर त्याच्या मोजमाप पुस्तीकेमध्ये नोंदी घेऊन पाणी वापर संस्था/ ग्रामपंचायतीला अनुज्ञेय रक्कम अदा करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन, त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०७२३१५३११२०८२६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Shamrao Prakshale

Digitally signed by Dilip Shamrao Prakshale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=80fd458e19a576d72881f3ee922a2cb280c33f29d50ff4ec45a46b93774420b0, serialNumber=ec0086a0fbc448d479f440cefd1d8dc3ee3b785deda1b06c300a38ec010d2289, cn=Dilip Shamrao Prakshale
Date: 2018.07.23 15:33:11 +05'30'

**(दि. शा. प्रक्षाळे)**
**कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मंबई.

२) मा.मुख्यमंत्री, यांचे अप्पर मुख्य सचिव.

३) मा.मंत्री (जलसंधारण)यांचे खाजगी सचिव

४) मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव

५) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

८) सचिव (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक

९) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता ) (लेखा परिक्षण ) महाराष्ट्र राज्य, मुंबई

१०) आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद.

११) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे.

११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.

१२) मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे.

१३) अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, सर्व.

१४) कार्यासन अधिकारी (जल-४), जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई.

१५) निवडनस्ती (जल-१).